THE

# Bombay Government Gazette.

**Published by Authority.**

THURSDAY, 4TH JANUARY 1894.

☞ *Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

# PART IX.—Marathi Acts, &c.

## सन १८७१ चा कैद्यांचा आक्ट सुधारण्याबाबदचा मसुदा.

ज्याअर्थी सन १८७१ चा कैद्यांचा आक्ट सुधारणें योग्य आहे, त्याअर्थी पुढील प्रमाणें ठरविण्यांत येत आहे :—

१. सदरहू आक्टाच्या १ ल्या कलमाच्या शेवटीं पुढील मजकूर जास्त दाखल केला पाहिजे. तो येणेंप्रमाणें :—

*१८७१ चा आक्ट ५, याच्या १ ल्या कलमांत जास्त मजकूर दाखल करणें.*

" या आक्टाच्या ३ ऱ्या किंवा ९ व्या भागांत तुरुंग [ प्रिझन ] किंवा जेल याविषयीं, किंवा कैदेंत ठेवणें किंवा अटकावून ठेवणें याविषयीं उल्लेख केला असेल त्यांत, सन्मार्गप्रवर्तक स्थळाचा किंवा सन्मार्गप्रवर्तक शाळेचा, किंवा अशा स्थळांत किंवा शाळेंत अटकावून ठेवणें याचा समावेश होतो असें समजावें. "

२. सदरहू आक्टाचें ९ वें कलम या कलमावरून रद्द केलें असे.

*१८७१ चा आक्ट ५, याचें ९ वें कलम रद्द करणें.*

३. (१) सदरहू आक्टाच्या १६ व्या कलमांत, " हुकुमावरून काम चालविणारे " या शब्दांच्या बदला, " सामान्य किंवा विशेष हुकुमाअन्वयें, ब्रिटिश इंडियांत किंवा ब्रिटिश इंडियाबाहेर, काम चालविणारे " हे शब्द दाखल केले पाहिजेत.

*१८७१ चा आक्ट ५, याच्या १६ व्या कलमाची सुधारणा करणें व त्या कलमांत जास्त मजकूर दाखल करणें.*

(२) त्याच कलमाच्या शेवटीं पुढील मजकूर जास्त दाखल केला पाहिजे. तो येणेंप्रमाणें :—

" किंवा, मलिका मआज्ञमाशीं स्नेहसंकेतानें असणाऱ्या कोणत्याही एतद्देशीय राजाच्या किंवा संस्थानाच्या कोणत्याही कोर्टानें किंवा न्यायसभेनें केलेला कोणताही शिक्षेचा ठराव अगर कोणताही हुकूम किंवा अशा कोर्टानें किंवा सभेनें कोणा मनुष्यास अटकेंत ठेवण्याविषयीं दिलेलें वारंट, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांची दरेक बाबतींत अगोदर मंजुरी घेऊन, अमलांत आणण्याचा अधिकार आहे :

" ज्या प्रसंगीं अशा कोणत्याही एतद्देशीय राजाच्या किंवा संस्थानाच्या एकाद्या कोर्टानें किंवा न्यायसभेनें, इंग्रज सरकारच्या एकाद्या अमलदाराच्या संमतिवांचून अमलांत आणतां येत नाहीं असा एकादा शिक्षेचा ठराव केलेला असेल, आणि या प्रकर-

णाचा निकाल करण्यासाठीं नांवानें किंवा हुद्याच्या नात्यानें मुद्दाम अधिकार दिलेल्या सदरील प्रकारच्या कोणत्याही अमलदारानें न्यायाच्या रीतीनें अशा ठरावाचा विचार त्याच्या गुणदोषांवरून करून तो बहाल केला असेल, तेव्हां असा ठराव व त्याला अनुसरून दिलेला कोणताही हुकूम किंवा वारंट हीं, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या हुकुमाअन्वयें काम चालविणाऱ्या कोर्टानें किंवा न्यायसभेनें केलेला शिक्षेचा ठराव, किंवा अशा कोर्टानें किंवा न्यायसभेनें दिलेला हुकूम किंवा वारंट असल्याप्रमाणें मानलीं पाहिजेत. "

१८७१ चा आक्ट ५, याच्या १९ व्या कलमाची सुधारणा करणें व त्या कलमांत जास्त मजकूर दाखल करणें.

४. (१) सदरहू आक्टाच्या १९ व्या कलमांत, " इलाक्याचे सरकारचे ताब्यांतील कोणतेही ठिकाणीं स्वाधीन घेण्याचा किंवा अटकवून ठेवण्याचा किंवा कैदेंत ठेवण्याचा अखत्यार देण्याचा अधिकार इलाक्याचे सरकारास आहे. " या मजकुराच्या बदला पुढील मजकूर दाखल केला पाहिजे. तो येणेंप्रमाणें :—

" गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांस किंवा स्थानिक सरकारास, प्रसंगाप्रमाणें, ब्रिटिश इंडियांत कोणत्याही ठिकाणीं, किंवा अशा सरकारच्या ताब्यांतील कोणत्याही ठिकाणीं स्वाधीन घेण्याविषयीं, अटकवून ठेवण्याविषयीं किंवा कैदेंत ठेवण्याविषयीं हुकूम फर्माविण्याचा अधिकार आहे. "

(२) त्याच कलमांत, " गुरें चोरणें " या शब्दांनंतर पुढील मजकूर सामील केला पाहिजे. तो येणेंप्रमाणें :—

" किंवा जें कृत्य ब्रिटिश इंडियांत केलें असतां, सन १८७९ चा परमुलुकांतील हुकुमत आणि अपराध्यांस स्वाधीन करणें यांविषयींचा आक्ट, याच्या परिशिष्टांत हिंदुस्थानचा अपराध्यांस शिक्षा करण्याविषयींचा कायदा याचीं कलमें सांगितलीं आहेत त्यांपैकीं कोणत्याही कलमाविरुद्ध अपराध केल्यादाखल होतें, तसें ( या कलमांत अपराध ह्मणून सांगितलेलें) दुसरें कोणतेंही कृत्य. "

(३) त्याच कलमाच्या विशेष ठरावाबद्दल पुढील मजकूर दाखल केला पाहिजे. तो येणेंप्रमाणें :—

" मात्र असें ठरविण्यांत येतें कीं सदरहू शिक्षेचे ठराव एकाद्या न्यायसभेपुढें इन्साफ होऊन सांगितलेले असले पाहिजेत, आणि अशा सभेंत अध्यक्षस्थानीं बसणारा जज्ज, किंवा ही सभा एकाहून अधिक जज्ज मिळून झालेली असल्यास, त्यांपैकीं निदान एक जज्ज हा ब्रिटिश सरकारचा अमलदार असून, त्याला अशा जज्जाचें काम करण्यास सदरहू एतद्देशीय राजाकडून किंवा संस्थानाकडून किंवा गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांजकडून अधिकार मिळाला असला पाहिजे. "

---

## हेतु व कारणें यांचें निरूपण.

प्रस्तुतच्या मसुद्याचा उद्देश, सन १८७१ चा कैद्यांचा आक्ट यांतील कित्येक व्यंगें, स्थानिक सरकारांनीं व इतर अधिकाऱ्यांनीं वेळोवेळीं हिंदुस्थान सरकारच्या नजरेस आणलेलीं आहेत, तीं दूर करणें हा आहे.

२. योजलेल्या सुधारणांपैकीं ज्यांबद्दल खुलासा करणें जरूर दिसतें, त्यांचा या पारिग्राफांत विचार केला आहे :—

**कलम १.** या कलमाचा उद्देश, सन्मार्गप्रवर्तक स्थळ किंवा सन्मार्गप्रवर्तक शाळा, सदरहू आक्टाच्या अर्थाप्रमाणें जेल किंवा तुरुंग यांतून कोणतेंच मानतां येत नाहीं असा आक्षेप निघाल्यावरून कांहीं अडचणी उपस्थित झाल्या आहेत, त्या दूर करणें हा आहे.

**कलम २.** सदरहू आक्टाचें कलम ९ हें, शिपायांच्या बंडाबाबद वार्षिक आक्ट यासंबंधीं असल्याकारणानें, त्याचा अमल बंद पडून सुमारें चौदा वर्षें झालीं आहेत.

**कलम ३.** सदरीं सांगितलेला कैद्यांचा आक्ट याचें १६ वें कलम लागू करण्याच्या संबधानें वेळोवेळीं संशय आलेले आहेत, ते दूर करण्याच्या इराद्यानें हें कलम दाखल केलें आहे. ब्रिटिश हिंदुस्थानच्या हद्दीपलीकडील कित्येक मुलुकांमध्यें अटकेंत ठेवण्याच्या सुरक्षित व योग्य जागा नसल्याकारणानें, किंवा इतर कांहीं कारणानें, कित्येक प्रसंगीं कैद्यांनीं आपल्या शिक्षा ब्रिटिश हिंदुस्थानांतील जेलांमध्यें भोगणें इष्ट आहे, कारण या ठिकाणीं त्यांना चांगल्या बंदोबस्तानें रखवालींत ठेवतां येईल.

**कलम ४.** सदरहू आक्टाचें कलम १९ यांत वरींच व्यंगें अढळून आलीं आहेत, तीं येणेंप्रमाणें :—

**पोटकलम** (१).—कैद्यांस स्वाधीन घेणें, अटकावून ठेवणें व कैदेंत ठेवणें यासंबंधी कित्येक बाबतींत **स्थानिक** सरकारास, त्या त्या प्रसंगीं जरूर असेल तितक्या त्वरेनें काम चालवितां येत नाहीं, व अशा प्रसंगीं सदरील उद्देश फक्त **गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल** यांच्याच हुकुमानें त्वरित सिद्धीस जाण्यासारखा आहे. ही अडचण, गुन्हा शाबीत झालेल्या मनुष्यांस एतद्देशीय संस्थानांतून पोर्ट ब्लेअर या वसाहतीस पाठविण्यांत येतें त्या प्रसंगीं वारंवार अनुभवास येते. ही वसाहत एकंदर हिंदुस्थानाच्या उपयोगाकरितां असल्याकारणानें ती, **गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल** यांच्या निर्बंधाखालीं, हिंदुस्थानाच्या इतर कोणत्याही भागापेक्षां विशेष प्रत्यक्ष रीतीनें येते हें उघड आहे.

**पोटकलम** (२).—या पोटकलमांत, हिंदुस्थान सरकारचा जाहिरनामा, नंबर १९८, तारीख १२ माहे आगस्ट सन १८७२, यांतील सारांश नमूद केला आहे.

**पोटकलम** (३).—कैद्यांच्या आक्टाच्या १९ व्या कलमांतील विशेष ठरावाची सुधारणा केली आहे तिजवरून, हें कलम मिश्र कोर्टांनीं अवल फौजदारी अधिकार चालवून केलेल्या शिक्षेच्या हुकुमांसच फक्त लागू आहे किंवा कसें, असा जो प्रश्न निघतो त्याचा उलगडा होईल.

तारीख १८ माहे अक्टोबर, सन १८९३.

ए. ई. मिलर.

(True Translation.)

M. A. BAIG,
Oriental Translator to Government.

## ब्रिटिश हिंदुस्थानांत मासळी मारण्यासंबंधीं कित्येक बाबतींबाबद ठराव करण्यासाठीं आक्टाचा मसुदा.

ज्या अर्थीं ब्रिटिश हिंदुस्थानांत मासळी मारण्यासंबंधीं कित्येक बाबतींबाबद ठराव करणें योग्य आहे; त्या अर्थीं यावरून खालीं लिहिल्याप्रमाणें कायदा करण्यांत येत आहे:—

१. (१) या आक्टास सन १८९३ चा हिंदुस्थानचा मासळी मारण्याचा आक्ट असें ह्मणावें; सरनामा, व्याप्ति व सुरुवात.

(२) तो सगळ्या ब्रिटिश हिंदुस्थानास लागू आहे; आणि

(३) तो एकदम अमलांत येईल.

२. सन १८८७ चा सामान्य कलमांचा आक्ट याच्या ८ व्या व १० व्या कलमांतील ठरावांस अनुसरून, हा आक्ट, ब्रिटिश हिंदुस्थानच्या कोणत्याहि भागांत मासळी मारण्याच्या संबंधानें जो कोणताहि इतर कायदा विवक्षित काळीं अमलांत असेल त्या कायद्यास पुरवणीदाखल आहे असें समजून वाचावा. हा आक्ट, मासळी मारण्यासंबंधी इतर कायद्यांस पुरवणीदाखल आहे असें समजून वाचावा.

३. या आक्टांत विषयास किंवा संदर्भास बाध येत नसेल तर,— व्याख्या.

(१) "मासळी" या शब्दांत कवचीची मासळी व कांसव यांचा समावेश होतो.

(२) "कायम यंत्र" याचा अर्थ जमिनींत बसविलेलें अगर कोणत्याहि इतर प्रकारें कायम केलेलें मासळी धरण्याचें कोणतेंहि जाळें, पिंजरा, सांपळा किंवा इतर साधन, असा आहे.

(३) "खासगी पाणी" याचा अर्थ जें पाणी कोणत्याहि मनुष्याची स्वतंत्र मिळकत असेल, किंवा ज्यांत कोणत्याहि मनुष्यास मासळी मारण्याचा स्वतंत्र हक्क असेल तें पाणी असा आहे.

४. (१) कोणाताहि मनुष्य मासळी जात येत असलेल्या कोणत्याहि पाण्यांत असलेली कोणतीहि मासळी धरण्याच्या किंवा तिचा नाश करण्याच्या इरादानें त्या पाण्यांत कोणत्याहि डैनमैटचा किंवा इतर बारी पदार्थाचा उपयोग करील तर त्यास पराकाष्ठा दोन महिन्यांच्या मुदतीपर्यंत कैदेची, किंवा पराकाष्ठा दोनशें रुपयांपर्यंत दंडाची शिक्षा होईल. जमिनीवरील पाण्यांत व समुद्र किनाऱ्यावर बारी पदार्थांनीं मासळीचा नाश करणें.

(२) पोट-कलम (१) यांत, "पाणी" या शब्दांत समुद्रकिनाऱ्यापासून दर्याच्या एका लीग (तीन मैलांच्या) अंतरांतील समुद्राचा समावेश होतो; आणि अशा समुद्रांत त्या पोट-कलमाअन्वयें जो अपराध केला असेल तो अशा किनाऱ्यावर येऊन भिडणाऱ्या जमिनीवर केलेला आहे असें समजून त्याप्रमाणें त्याचा इन्साफ करण्याचा व त्याबदल शिक्षा करण्याचा अधिकार आहे.

पाणी विषारी करून मासळीचा नाश करणें.

५. (१) कोणताहि मनुष्य कोणत्याहि पाण्यांत कोणतेंहि विष, चुना किंवा अपकारक पदार्थ, त्याच्या योगानें कोणतीहि मासळी धरण्याच्या किंवा तिचा नाश करण्याच्या इरादानें टाकील, तर त्यास पराकाष्ठा दोन महिन्यांच्या मुदतीपर्यंत कैदेची, किंवा पराकाष्ठा दोनशें रुपयांपर्यंत दंडाची शिक्षा होईल.

(२) या आक्टाच्या परिशिष्टाच्या अनुक्रमें पहिल्या व दुसऱ्या आसनांत सांगितलेल्या कित्येक कायद्यांसमोर, त्या परिशिष्टाच्या तिसऱ्या आसनांत निर्दिष्ट केलेले शब्द, आणि मासळी धरण्याच्या किंवा तिचा नाश करण्याच्या कारणासाठीं पाणी विषारी करण्याचें नियमन करण्याच्या संबंधानें ज्या कोणत्याहि कानू हा आक्ट ठरण्याच्या लगेच पूर्वी अमलांत असतील त्या कानू, हीं यावरून रद्द केलीं आहेत.

अपराध.

६. जो कोणताहि मनुष्य कोणत्याहि खासगी पाण्यांत त्या पाण्याच्या किंवा मासळी मारण्याच्या जागेच्या मालकाच्या परवानगीवांचून मासळी मारील किंवा कोणतेंहि कायम यंत्र उभारील, ठेवील, चालू ठेवील अगर त्याचा उपयोग करील त्यास पहिल्या अपराधाबदल पराकाष्ठा पन्नास रुपयांपर्यंत दंडाची शिक्षा होईल,

आणि पुढें प्रत्येक अपराधाबदल पराकाष्ठा एक महिन्याच्या मुदतीपर्यंत कैदेची किंवा पराकाष्ठा दोनशें रुपयांपर्यंत दंडाची शिक्षा होईल, अगर या दोनही शिक्षा होतील:

मात्र असें ठरविलें आहे कीं या कलमांतील कोणताहि ठराव, कोणत्याहि मनुष्यानें खरा हक्क चालवून केलेल्या कोणत्याहि कृत्यास लागू आहे असें, किंवा त्यावरून कोणत्याहि मनुष्यास नौकागम्य नदीच्या कोणत्याहि भागांत काठीला बांधलेल्या गळानें अगर नुस्त्या गळानें मासळी धरण्याची मनाई आहे असें समजूं नये.

सरकारदाखल करणें.

७. (१) जें कोणतेंहि कायम यंत्र सदरील शेवटल्या कलमाविरुद्ध उभारलें, ठेविलें, चालू ठेविलें अगर वापरलें असेल तें, व या आक्टाविरुद्ध अशा कोणत्याहि यंत्राच्या योगानें किंवा इतर रीतीनें जी कोणतीहि मासळी धरली असेल ती सरकारदाखल करण्यांत येईल असें समजावें; आणि

(२) सदरीं सांगितलेल्या प्रकारचें कोणतेंहि कायम यंत्र जागचें उचलून नेण्याचा किंवा आपल्या कबज्यांत घेण्याचा जिल्हा म्याजिस्ट्रेटास किंवा त्यानें या बाबतींत अधिकार दिलेल्या कोणत्याहि मनुष्यास अखत्यार आहे.

६ व्या कलमाखालीं येणारा एकादा अपराध करण्याच्या इरादानें दुसऱ्याच्या जमिनीवर किंवा खासगी पाण्यावर शिरणें.

८. जो कोणी दुसऱ्याच्या कबज्यांत असलेल्या जमिनीवर किंवा कोणत्याहि खासगी पाण्यावर, ६ व्या कलमांत निर्दिष्ट केलेल्या अपराधांपैकीं कोणताहि अपराध करण्याच्या इरादानें शिरेल त्यास पराकाष्ठा पन्नास रुपयांपर्यंत दंडाची शिक्षा होईल.

स्थानिक सरकारानें केलेल्या कानूंच्या द्वारें निवडक पाण्यांतील मासळीचें संरक्षण.

९. (१) स्थानिक सरकार, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांची पूर्वी मंजुरी घेऊन, या कलमांत पुढें सांगितलेल्या कारणांसाठीं कानू करण्यास, व सरकारी ग्याझेटांत जाहिरनामा प्रसिद्ध करून, सरकारची मिळकत ह्मणून असलेलें जें पाणी असें स्थानिक सरकार त्या जाहिरनाम्यांत निर्दिष्ट करील त्या पाण्यास त्या सर्व किंवा त्यांतून कोणत्याहि कानू लागू करण्यास मुखत्यार आहे.

(२) तसेंच स्थानिक सरकार इतर पाण्यांस, त्या पाण्यांच्या मालकाच्या, व त्यांत हितसंबंध असणारीं दुसरीं मनुष्यें, कांहीं असल्यास, त्या सर्व मनुष्यांच्या, अनुमतानें, अशा कानू किंवा त्यांपैकीं कोणत्याहि कानू, तसाच जाहिरनामा प्रसिद्ध करून, लागू करण्यास मुख्त्यार आहे.

(३) अशा कानूंमध्यें, खालीं सांगितलेल्या सर्व किंवा कोणत्याहि बाबतींची मनाई करण्याचा किंवा शिस्त ठरविण्याचा अधिकार आहे, ह्मणजे :—

(अ) कायम यंत्रें उभारणें, ठेवणें, चालू ठेवणें व त्यांचा उपयोग करणें ;

(ब) धरण बांधणें ;

(क) पोट-कलम (१) किंवा पोट-कलम (२) याअन्वयें जाहीर केलेल्या सर्व किंवा कोणत्याहि पाण्यांत वर्षाच्या सर्व किंवा कोणत्याहि ऋतूंत, जाळें ओलें असलें ह्मणजे गांठीपासून गांठीपर्यंत मोजलीं असतां निर्दिष्ट केलेल्या आकारमानाहून लहान नाहींत अशा भोंकांच्या जाळ्यांचा उपयोग करणें ;

(ड) कोणत्याहि ठरविलेल्या बंदीच्या ऋतूंत सर्व किंवा कोणत्याहि जातीची मासळी धरणें किंवा विकणें; आणि

(ई) मासळी धरण्याच्या कारणासाठीं कोणतेंहि पाणी वळवून दुसरीकडे नेणें किंवा तें उपसणें.

(४) तसेंच अशा कानूंवरून, कोणत्याहि निर्दिष्ट केलेल्या पाण्यांत दोन वर्षांहून अधिक नाहीं अशा मुदतीपर्यंत सर्व प्रकारें मासळी मारण्याचीहि मनाई करण्याचा अधिकार आहे.

(५) या कलमाअन्वयें कोणत्याहि कानू करतांना स्थानिक सरकार—

(अ) तिचें उल्लंघन करण्याबद्दल पराकाष्ठा शंभर रुपयांपर्यंत दंडाची शिक्षा होईल, आणि तें उल्लंघन करण्याचें काम चालू राहिल्यास, पहिल्या दिवसानंतर ज्या ज्या दिवशीं तें उल्लंघन करण्याचें काम चालू राहील त्या प्रत्येक दिवसाबद्दल आणखी पराकाष्ठा दहा रुपयांपर्यंत दंडाची शिक्षा होईल असें फर्माविण्यास, आणि

(ब) (१) त्या कानूविरुद्ध उभारलेलें, ठेवलेलें, चालू ठेवलेलें किंवा उपयोग केलेलें कायम यंत्र, किंवा उपयोग केलेलीं जाळीं धरणें, सरकारदाखल करणें व जागचीं उचलून नेणें याबाबद,

(२) अशा कोणत्याहि कायम यंत्राच्या योगानें किंवा जाळ्याच्या योगानें धरलेली कोणतीहि मासळी सरकारदाखल करण्याबाबद, आणि

(३) असें कोणतेंहि कायम यंत्र उभारणाऱ्या, ठेवणाऱ्या, चालू ठेवणाऱ्या किंवा त्याचा उपयोग करणाऱ्या मनुष्यापासून, तें जागचें उचलून नेण्याचा खर्च वसूल करण्याबाबद,

ठराव करण्यास

मुख्त्यार आहे,

आणि असा खर्च, तो जमीनमहसुलाची बाकी येणें असल्याप्रमाणें वसूल करावा असा ठराव करण्यास मुख्त्यार आहे.

(६) या कलमाअन्वयें कानू करण्यास जो अधिकार दिला आहे तो, कानू करण्यापूर्वी त्या प्रसिद्ध केल्या पाहिजेत, या शर्तीस पात्र आहे.

१०. स्थानिक सरकारानें या बाबतींत ज्या कोणत्याहि मनुष्यास, नांवानें किंवा हुद्यानें, मुद्दाम नेमिला असेल तो मनुष्य, ४ थ्या, ५ व्या, ६ व्या, किंवा ८ व्या

या आक्टाअन्वयेंच्या अपराधाबद्दल वारंटावांचून धरणें.

कलमाअन्वयें, अथवा ९ व्या कलमाअन्वयें केलेल्या कोणत्याहि कानूअन्वयें शिक्षा व्हावयाजोग्या कोणत्याहि अपराधांत संबंध असलेल्या कोणत्याहि मनुष्यास, किंवा ज्याचे विरुद्ध, त्याचा सदर्हूप्रमाणें संबंध असल्याबद्दल वाजवी अर्ज करण्यांत आला असेल अथवा विश्वसनीय माहिती मिळाली असेल तशा कोणत्याहि मनुष्यास, म्याजिस्ट्रेटाच्या हुकुमावांचून व वारंटावांचून धरण्यास मुखत्यार आहे.

## परिशिष्ट.

### कायद्यांचे भाग रद्द केले ते.

(कलम ९, पोट-कलम (२) पहा.)

| कायदा. | कायद्याच्या ज्या भागांत रद्द केलेले शब्द आले आहेत तो भाग. | अशा भागांत रद्द केलेले शब्द. |
|---|---|---|
| | गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांचे आक्ट. | |
| सन १८७८ चा ७ वा. | कलम २९, रकम (ऐ). | "किंवा पाणी विषारी करील." |
| | कलम ३१, रकम (ज). | "व पाणी विषारी करणें." |
| * | * | * |
| * | * | * |

### हेतु व कारणें यांचें निरूपण.

गोड्या पाण्यांतील मासळीच्या संरक्षणासाठीं कायदा करण्याच्या विषयास सुरुवात झाली ती, मद्रासच्या वैद्यकीय खात्यांतील डाक्टर एफ्. डे यांना त्यासंबंधानें चौकशी करण्याच्या कारणासाठीं मुद्दाम नेमून त्यांनीं बऱ्याच काळापूर्वीं ह्मणजे सन १८६९ साली चौकशी केली त्या वेळीं झाली. त्यानंतर, मासळी मारण्याच्या संबंधानें आक्ट ठरवावा अशी शिफारस करून डाक्टर डे यांनीं वायव्य प्रांतांबाबद केलेल्या रिपोर्टावर सन १८७१ च्या आक्टोबर महिन्यांत ठराव करण्यांत आला. डाक्टर डे यांनीं केलेल्या शिफारसी, व तसेंच निरनिराळ्या स्थानिक सरकारांनीं सन १८८८ सालापर्यंत यासंबंधानें जें जें कांहीं केलें किंवा ज्या ज्या सूचना केल्या त्यांचा सारांश, त्या सालीं दिल्ही येथें भरलेल्या शेतकीसंबंधी कॉन्फरन्ससाठीं तयार केलेल्या टिपणांत दिला होता.

२. सारांश, कित्येक प्रांतांकडून या बाबतींत जे उपाय योजण्यांत आले ते येणेंप्रमाणें:—सन १८७५ सालीं ब्रिटिश ब्रह्मदेश ह्मणजे ज्याला हल्लीं लोअर ब्रह्मदेश ह्मणतात त्यासाठीं मासळी मारण्याबाबद आक्ट ठरविण्यांत आला. सन १८८० सालीं पंजाब सरकारानें याबाबदच्या आक्टाचा व कानूंचा खर्डा सादर केला. सन १८८१ सालीं मुंबई सरकारानें शिकारीचीं जनावरें व मासळी यांच्या रक्षणासाठींच्या आक्टाचा मसुदा सादर केला. सन १८८३ सालीं मद्रास सरकारानें मासळी मारण्याबाबदच्या आक्टाच्या मसुद्याचा खर्डा सादर केला. सन १८८९ सालीं वायव्य प्रांतांच्या सरकारानें डोंगरांमधील पाण्यांतील मासळीच्या रक्षणासाठीं कुमेआनच्या कमिशनरानें केलेल्या शिफारसी सादर केल्या.

३. दिल्ही येथें भरलेल्या कान्फरन्सनें खालीं लिहिलेल्या पांच गोष्टी करण्यांत याव्या ह्मणून एकमतानें शिफारस केली ; त्या गोष्टी येणेंप्रमाणें :—

(१) मासळीचा नाश करण्यासाठीं डैनमैटचा व इतर बारी पदार्थांचा उपयोग करण्याची मनाई करणें.

(२) पाण्यांत विष घालण्याची मनाई करणें.

(३) कशाहि लहानमोठ्या नद्यांमध्यें धरणांवर व इतर बांधकामांवर मासळी चढण्याचे घाट बांधणें: यांची कमींतकमी रुंदी दाहा यार्ड असावी असें सुचविलें आहे.

(४) अशा नद्यांमध्यें मासळी आडविण्याकरितां जे बांधारे किंवा यंत्रें बसविलीं असतील त्याचें नियमन करणें.

(५) मासळीचा संचय असलेल्या पाण्याच्या डबक्यांचें संरक्षण करणें.

सदर्हू कान्फरन्सच्या मेंबरांचीं ज्या गोष्टींच्या जरूरीच्या संबंधानें भिन्नभिन्न मतें पडलीं त्या गोष्टी येणेंप्रमाणें:—

(अ) जाळ्यांच्या भोंकांच्या आकारमानाचें नियमन करणें.

(ब) मासळी धरण्याच्या कारणासाठीं नद्या व नाले यांतील पाणी उपसण्याची मनाई करणें किंवा शिस्त ठरविणें.

(क) एकाद्या प्रांतांतील पाण्यांत किंवा नद्यांत मासळी मारण्याच्या हक्काचा निर्बंध आपलेकडे घेण्याचा अधिकार सरकारास देणें.

सदर्हू कान्फरन्सनें यासंबंधानें चालविलेल्या कामांचे कागदपत्र स्थानिक सरकारांकडे पाठवून त्यांचीं मतें घेण्यांत आलीं. परंतु या बाबतीच्या संबंधानें निकाल करण्याचें काम मद्रासेहून जबाब येईपर्यंत लांबणीवर टाकावें लागलें.

४. इतक्या अवकाशांत बंगालच्या सरकाराकडून खासगी पाण्यांत चोरून मासळी मारण्याची मनाई करण्यासाठीं सन १८८९ चा आक्ट २ रा ठरविण्यांत आला.

५. हिंदुस्तान सरकारच्या मताप्रमाणें, या देशांत लागणाऱ्या अतिशय महत्वाच्या अन्नसामग्रीच्या पदार्थांपैकीं एका पदार्थाचें, खासगी व्यक्तींचे हक्कसंबंध कायम ठेवून, होईल तेथवर पूर्णपणें रक्षण करणें ही गोष्ट इतक्या महत्वाची आहे कीं त्या संबंधानें कायदा करणें रास्त आहे. जरी ही गोष्ट बऱ्याच काळापासून कबूल करण्यांत आली आहे व या विषयाच्या संबंधानें हल्लीं वीस वर्षांहून अधिक कालापासून विचार चालला आहे तथापि कोणतेहि उपाय योजले असतां तेणेंकरून खासगी व्यक्तींच्या हक्कांस बराच प्रत्यवाय येण्याचा संभव असल्यामुळें तसे कोणतेच उपाय योजण्याची स्थानिक सरकारांनीं माघार घेणें हें स्वाभाविक व योग्य असल्यामुळें यासंबंधानें आजपर्यंत कांहीं तजवीज करण्यांत आलेली नाहीं. खासगी व्यक्तींचा हितसंबंध असलेल्या पाण्यामधील मासळीच्या संरक्षणासाठीं खरोखर उपाय योजण्यास असा नाराजीपणा दाखविला तो, कायद्याच्या द्वारें अटकाव केला असतां लोकांना अपायकारक असे परिणाम घडतील अशी खात्री झाल्यामुळें दाखविला असें नसून ते परिणाम कोणत्या प्रकारचे घडतील याबद्दल संशय असल्यामुळें दाखविला असावा. तूर्त तावडतोबीचा उपाय ह्मणून जें कांहीं करण्याचें योजिलें आहे तें, निःसंशय अपकारक असलेल्या कित्येक चाली बंद करणें आणि सरकारच्या मालकीचे कांहीं निवडक नाले व मोठाले पाण्याचे संचय व इतर कांहीं निवडक नाल्यांच्या व पाण्यांच्या मालकांच्या किंवा त्यांत हितसंबंध असणाऱ्या मनुष्यांच्या अनुमतानें तसे नाले व पाण्यांचे संचय आपल्या व्यवस्थेखालीं घेण्याचा स्थानिक सरकारांस अधिकार देणें हें होय. असें केल्यानें, अभीष्ट हेतु सिद्धीस जाण्यास कोणत्या तजविजी करणें अगदीं अवश्य आहे याबाबद खरा अनुभव येईल असें वाटलें आहे.

तूर्त खासगी पाण्यांच्या संबंधानें, या सगळ्या देशांतील मासळी मारण्याच्या सर्व खासगी जागा जेणें करून सन १८८९ चा बंगालचा आक्ट २ रा (खासगी पाण्यांमध्यें मासळी मारण्याच्या हक्काचें रक्षण करण्याबाबद आक्ट) याच्या अमलाखालीं येतील अशा प्रकारें त्या आक्टाच्या ठरावांची व्याप्ति वाढविण्यापेक्षां ज्यास्त कांहीं करण्याची योजना केलेली नाहीं.

६. यासंबंधानें दोन मुद्यांवर एकदम निश्चयात्मक सिद्धांत करतां येतात: त्यांपैकीं पहिला मुद्दा हा कीं डैनमैटचा उपयोग करणें व विष घालणें हीं जीं राजरोशीचीं कृत्यें, त्यांच्या योगानें अन्नाच्या पदार्थांचा स्वेच्छ व निरर्थक नाश करण्यांत येतो ही गोष्ट ध्यानांत ठेवून तीं कृत्यें थोड्या बहुत आयासानें बंद करतां येण्यासारखीं असल्यामुळें त्यांची सर्वत्र मनाई करावी हा होय. दुसरा मुद्दा ह्मटला ह्मणजे, एका पक्षीं डाक्टर डे यांनीं सुचविलें आहे त्याप्रमाणें पावसाळ्यांत मोठमोठ्या नद्यांतील बहुतेक उपयुक्त मासे अंडीं घालीत असल्यामुळें व त्या ऋतूंत त्या नद्यांना मोठे पूर येऊन त्यांचें सहज रक्षण होत असल्यामुळें व दुसऱ्या पक्षीं अशा नद्या, नद्यांवरील पोलिसाच्या निर्बंधाबाहेर असल्यामुळें त्यांच्या-

वर इतर प्रतिबंध ठेवण्याची जरूरी नाहीं किंवा तसे प्रतिबंध ठेवणें अशक्य आहे हा होय. याप्रमाणें विचार केला ह्मणजे सदरील मुद्दे साधारणतः लहान लहान नद्यांतील मासळीचें संरक्षण करण्याच्या बाबतींत ज्यास्त प्रतिबंध अमलांत आणण्याच्या विषयास लागू होतात असें दिसून येईल.

७. हल्लीं जो कायदा करण्याचें योजिलें आहे त्याचे हेतु खालीं सांगितल्याप्रमाणें आहेत ; ह्मणजे—

(१) ब्रिटिश हुकुमतीच्या आंतील सर्व पाण्यांत डैनमैटचा व विषाचा उपयोग करण्याची मनाई करणें; यांपैकीं डैनमैटच्या संबंधाची मनाई ब्रिटिश ताब्यांतील समुद्राच्या पाण्यास लागू करण्याची योजना आहे;

(२) सन १८८९ चा बंगालचा मासळी मारण्याच्या खासगी जागांचें संरक्षण करण्याबाबद आक्ट याचे ठराव सर्वत्र लागू करणें;

(३) हिंदुस्थान सरकारची पूर्वीं मंजुरी घेऊन, खालीं लिहिलेल्या कारणांसाठीं कानू करण्याचा, आणि त्या कानू सरकारची मिळकत ह्मणून असलेल्या कोणत्याहि निवडक नाल्यांना किंवा इतर पाण्याच्या संचयांना, किंवा कोणत्याहि इतर नाल्यांच्या अथवा पाण्याच्या संचयांच्या मालकांच्या किंवा त्यांत हितसंबंध असणाऱ्या मनुष्यांच्या अनुमतानें त्या नाल्यांना किंवा पाण्याच्या संचयांना, लागू करण्याचा प्रत्येक स्थानिक सरकारास अधिकार देणें; सदर्हू कारणें वितपशील :—

(अ) (१) मासळी धरण्यासाठीं बसविलेल्या यंत्रांचा उपयोग करण्याची, आणि (२) धरणें बांधण्याची मनाई करणें किंवा शिस्त ठरविणें;

(ब) कमींत कमी जें आकारमान ठरविण्यांत येईल त्याहून लहान भोंकांच्या जाळ्यांचा उपयोग करण्याची मनाई करणें किंवा शिस्त ठरविणें;

(क) बंदी केलेल्या कोणत्याहि ऋतूंत सर्व किंवा कोणत्याहि जातीची मासळी धरण्याची किंवा विकण्याची मनाई करणें किंवा शिस्त ठरविणें; आणि

(ड) दोन वर्षांहून अधिक नाहीं इतक्या मुदतीपर्यंत कोणत्याहि पाण्यांत मासळी मारण्याची पुरी बंदी करणें;

(४) योजलेल्या कायद्याचें व त्याअन्वयें केलेल्या कानूंचें उलंघन करण्याबद्दल योग्य शिक्षा ठरविणें; आणि

(५) स्थानिक सरकारानें या बाबतींत मुद्दाम अखत्यार दिलेल्या मनुष्यांना, अशा कायद्याविरुद्ध किंवा कानूंविरुद्ध करण्यांत आलेल्या अपराधांबदल, वारंटावांचून धरण्याचा अधिकार देणें.

तारीख २८ सेप्टेंबर सन १८९३.

(सही) फिल. पी. हचिन्स.

(True Translation.)

M. A. BAIG,
Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.